# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला
दिनांक — २८/०४/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आरोपी क्र. १) श्री. राजेश राजदेव यादव, वय ५५ वर्ष, पद— सहाय्यक निबंधक कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी<br>आरोपी क्र. २) श्री. गणेश नारायणराव कुकडे, वय ३५ वर्ष, पद— मुख्य लिपीक, कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी |
| ३ | घटना तारीख वेळ | दिनांक २८.०४.२०२५ चे १४.०७ ते १४.३० वा |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | आरोपी क्र. १) श्री. राजेश राजदेव यादव यांनी रू.५०००/—<br>आरोपी क्र. २) श्री. गणेश नारायणराव कुकडे यांनी रू. ३०००/— |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | आरोपी क्र. १) श्री. राजेश राजदेव यादव यांनी रू. ५०००/—<br>आरोपी क्र. २) श्री. गणेश नारायणराव कुकडे यांनी रू. ३०००/— |
| ६ | घटनास्थळ | कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती |

थोडक्यात हकिगत :— यातील तक्रारदार यांनी नियोजित मधुगबाई कृतारण सहकारी संस्था मर्या. भंडारज ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती या नावाने संस्था नोंदणी करण्याकरीता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी येथे आवश्यक सर्व कागदपत्रासह दिनांक ०९.१२.२०२४ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनु षंगाने तक्रारदार हे दिनांक २२.०४.२०२५ रोजी सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी येथे जावून श्री. राजेश यादव, सहाय्यक निबंधक यांना भेटून संस्था नोंदणी बाबतचे काम झाले काय? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी संस्था नोंदणी करून प्रमाणपत्र देण्याकरीता तक्रारदाराकडे ७०००/— रूपयाची मागणी केली. त्यावेळी तक्रारदाराने नाईलाजास्तव श्री. राजेश यादव यांना २०००/— रूपये दिले व उर्वरीत रू. ५०००/— नंतर आणून देतो असे सांगीतले. परंतु तक्रारदारास उर्वरीत लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी त्यांचेविरूध्द ला.प्र.वि. अकोला येथे दिनांक २२.०४.२०२५ रोजी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीवरून दिनांक २५.०४.२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच पडताळणी कारवाई दरम्यान यातील आरोपी क्र. १) श्री. राजेश यादव, सहाय्यक निबंधक यांनी स्वत:करीता ५,०००/— रूपये व आरोपी क्र. २ श्री. कुकडे, लिपीक यांनी तक्रारदाराकडे ३०००/— रूपये लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दिनांक २८.०४.२०२५ रोजी सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी येथे रचण्यात आलेल्या यशस्वी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. १) श्री. राजेश राजदेव यादव यांनी तक्रारदाराकडुन रू. ५०००/— व आरोपी क्र. २) श्री. गणेश नारायणराव कुकडे यांनी तक्रारदाराकडुन रू. ३०००/— लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यावरून नमुद दोन्ही आरोपीताना लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले असुन पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारूती जगताप, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी श्री. मिलिंदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, पोलीस अमलदार दिगांबर जाधव, राहुल इंगळे, अभय वावस्कर, संदिप ताले, किशोर पवार, निलेश शेगोकार, असलम शहा, चालक नफीस यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्याचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथील खालील क्रमांकवर संपर्क साधावा.

**फोन नं.०७२१—२५५२३५५, टोल फ्रि नंबर—१०६४**

(मिलींदकुमार अ. बहाकर)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला